# 11 जुलै 2021 चालू घडामोडी PDF DOWNLOAD

**दिनविशेष**

- राष्ट्रीय मत्स्य उत्पादक दिवस - 10 जुलै.
- जागतिक लोकसंख्या दिवस - 11 जुलै.

**आंतरराष्ट्रीय**

- व्हिएतनाम देशाचे नवीन पंतप्रधान - फाम मिन्ह चिन.
- 9 जुलै रोजी, खादी व ग्रामोद्योग आयोगाने (KVIC) ____ या तीन देशांमध्ये "खादी" ब्रँडसाठी ट्रेडमार्क म्हणजेच व्यापारचिन्ह नोंदणी निश्चित केली आहे - भूतान, संयुक्त अरब अमिराती आणि मेक्सिको (इतर 6 देश: जर्मनी, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, रशिया, चीन आणि युरोपीय संघ).
- 9 जुलै 2021 रोजी _ देशाने 'कर धोरण आणि हवामान बदल' विषयक जी-20 देशांसाठी उच्च-स्तरीय कर परिसंवाद कार्यक्रम आयोजित केला - इटली.
- आर्क्टिक सर्कल असेंब्ली 14 ऑक्टोबर ते 17 ऑक्टोबर 2021 या काळात _ येथे वार्षिक कार्यक्रम आयोजित करणार आहे - रिक्जेविक, आइसलँड.
- शांघाय सहकार्य संघटना (SCO) देशांच्या प्रमुखांची शिखर बैठक 16 सप्टेंबर आणि 17 सप्टेंबर रोजी ____ येथे होणार आहे - दुशान्बे, ताजिकिस्तान.

**राष्ट्रीय**

- भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO), न्यूस्पेस इंडिया लिमिटेड (NSIL) आणि अंतरिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय उद्योग महासंघ (CII) _ या संकल्पनेखाली 13 सप्टेंबर ते 4 ऑक्टोबर 2021 या कालावधीत आभासी आंतरराष्ट्रीय अंतराळ परिषद आणि प्रदर्शनी आयोजित करणार आहे - 'बिल्डिंग न्यूस्पेस इन इंडिया'.
- भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद (ICCR) ____ विद्यापीठात 'बंगाबंधू चेयर' स्थापन करणार आहे - दिल्ली विद्यापीठ.

**व्यक्ती विशेष**

- नवीन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री - महेंद्र नाथ पांडे.

- इंटरनॅशनल एर्गोनोमिक्स असोसिएशन या संस्थेने मानवी घटक आणि एर्गोनोमिक्स या विषयांवरील संशोधनासाठी _ यांना '2021 IEA/ किंगफार पुरस्कार'ने सन्मानित केले - विभा भाटिया (भारत).

**क्रिडा**

- नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया (NRAI) याचे संयुक्त सरचिटणीस *यांची 2020 टोकियो ऑलिम्पिक स्पर्धांसाठी पहिले-वहिले भारतीय पंच म्हणून निवड झाली - पवन सिंग.*

***राज्य विशेष***

- *'21 वा राष्ट्रीय मत्स्य शेतकरी / उत्पादक दिवस 2021'* __ राज्यात साजरा झाला - मणिपूर.
- 10 जुलै 2021 रोजी, _ राज्य कायदा आयोगाने प्रस्तावित लोकसंख्या नियंत्रण विधेयकाचा पहिला मसुदा जाहीर केला, ज्यात दोन पेक्षा जास्त मुले असणाऱ्या लोकांना सरकारी योजनांचा लाभ न देण्याची तरतूद आहे - उत्तर प्रदेश.
- मध्य प्रदेश सरकारने आपत्ती व्यवस्थापन व राज्यातील कोणत्याही अनुचित प्रकाराला आळा घालण्यासाठी ____ येथे 'स्थिती कक्ष' (situation room) तयार केला - भोपाळ.
- राजस्थान सरकारने _ येथे राज्यातील प्रथम आदिवासी मुलांची हॉकी प्रबोधिनी स्थापन करण्याची घोषणा केली - उदयपूर.

**ज्ञान-विज्ञान**

- भुवनेश्वरच्या डीबीटी-इन्स्टिट्यूट ऑफ लाइफ सायन्सेस या संस्थेचे शास्त्रज्ञ आणि एसआरएम-डीबीटी पार्टनरशिप प्लॅटफॉर्म फॉर ॲडव्हान्स लाइफ सायन्सेस टेक्नोलॉजीज, एसआरएम इंस्टीट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (तमिळनाडू) यांनी संयुक्तपणे केलेल्या एका अध्ययनात, पहिल्यांदाच, '_____' या खारफुटीच्या मीठ प्रसवणाऱ्या जातीच्या संपूर्ण संदर्भ-श्रेणीतील जीनोम सिक्वेन्सिंग म्हणजेच जनुकीय रचना उलगडण्यात यश मिळाले आहे - 'अ‍ॅव्हीसिनिया मरीना'.
- चीनी संशोधकांनी विकसित केलेला जगातील सर्वात शक्तिशाली क्वांटम संगणक - झुचोंगक्जी क्वांटम कॉम्प्युटर (66-क्युबीट यंत्र).

**सामान्य ज्ञान**

- "नगरपालिका याची व्याख्या" यासंबंधी संविधानिक तरतूद – कलम 243P (खंड 9अ).

- "सहकारी संस्था याची व्याख्या" यासंबंधी संविधानिक तरतूद –
  कलम 243ZH (खंड 9ब).
- "अनुसूचित क्षेत्र आणि आदिवासी क्षेत्रांचे प्रशासन" यासंबंधी संविधानिक तरतूद –
  कलम 244.
- "आसाममधील काही आदिवासी विभागांचा समावेश असलेला एका स्वायत्त राज्याची निर्मिती तसेच स्थानिक विधिमंडळ किंवा मंत्रीपरिषद किंवा त्या दोन्हीची स्थापना" यासंबंधी संविधानिक तरतूद – कलम 244अ.
- “विशिष्ट न्यायालयांची स्थापना करण्याचा संसदेचा अधिकार” यासंबंधी संविधानिक तरतूद - कलम 247.
- “विधी तयार करण्याचा अवशिष्ट अधिकार” यासंबंधी संविधानिक तरतूद –
  कलम 248.

Officers Online Academy
eLearning Education Platform